प्रजा जागृती

पुणे, शुक्रवार, दि. १० जुलै २०२६

# माउली-एक कालातीत परंपरा' भारतनाट्यम रविवारी

## आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या नृत्यांगणा कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर यांची प्रस्तूती



**पुणे : माऊली-एक कालातीत परंपरा' भारतनाट्यम रविवारी आयोजित करण्यात आली आहे. या कार्यक्रमाची माहिती देताना डॉ. केतन देशपांडे व इतर मान्यवर.**

**पुणे :** भक्ती, परंपरा, कला व ईश्वर यांच्यातील कालातीत संबंधाचा उत्सव म्हणजे ' माऊली-एक कालातीत परंपरा' आहे. पंढरपूर वारीचा आत्मा जिवंत करणारी ही कला आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या भरतनाट्यम् कलाकार, नृत्यदिग्दर्शक आणि संशोधक कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर यांच्या भरतनाट्यमचा कार्यक्रम पुणेकरांना अनुभवता येणार आहे.

हा कार्यक्रम रविवार दि.१२ जुलै रोजी कोथरूड, मयूर कॉलनी येथील एमईएस सभागृहात सायंकाळी ५ ते ६.१५ वाजेपर्यंत होणार आहे. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे, अशी माहिती फ्युएल

डॉ. केतन देशपांडे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या वेळी आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या नृत्यांगणा, भरतनाट्यम कलाकार, नृत्यदिग्दर्शक आणि संशोधक कलाईमामनी बाला देवी चंद्रशेखर, फ्युएल च्या विभागप्रमुख प्रा. प्राची अहिरराव आणि चंद्रशेखर उपस्थित होते.

डॉ. केतन देशपांडे यांनी सांगितले की, सीएसआरच्या माध्यमातून मोफत शिक्षण देणाऱ्या फ्युएल शैक्षणिक संस्थेतील १० मुलींच्या शिक्षणाला सहाय्य करण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. बाला देवी चंद्रशेखर यांनी संतांच्या अभंगांच्या ओव्या एकसंधपणे जोडून संपूर्ण वारकरी सांप्रदायाचा प्रवास रंगमंचावर साकार करणाऱ्या पहिल्या